# विवा महाविद्यालयातील मराठी वाङ्मय मंडळाची उद्‌घाटनपर नांदी

**दि. १९ ऑगस्ट २०१७**

एकापेक्षा एक सरस शैक्षणिक तथा सांस्कृतिक कार्यक्रम देणाऱ्या विवा महाविद्यायातील मराठी वाङ्मय मंडळाचे औपचारिक उद्‌घाटन प्रा. लेखक भगवान इंगळे यांच्या हस्ते झाले.

शनिवार दिनांक १९/०८/२०१७ या दिवशी **मराठी वाङ्मय मंडळाचा उद्‌घाटनपर कार्यक्रम** विवा महाविद्यालयात साजरा झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रथितयश लेखक प्रा. भगवान इंगळे यांनी भूषविले. प्रा. इंगळे यांच्या आत्मकथनपर **'ढोर'** या पुस्तकावर आधारित **'लेखकाच्या नजरेतून'** या विषयावर व्याख्यान सदृश्य गप्पांच्या मैफिलीने कार्यक्रमाची सुरूवात झाली. प्रा. इंगळे यांचा प्रतिकूल परिस्थितीत भवतालाला दिलेला लढा तसेच यात झालेली एक व्यक्ती म्हणून त्यांची जडणघडण इत्यादींवर **'ढोर'** या पुस्तकाच्या माध्यमातून उद्‌बोधन झाले. खर्डा, अहमदनगर सारख्या दुर्गम भागातून विशेषतः एका **दुर्लक्षित समाजातून पुढे येऊन शिक्षण घेणे**, आपल्या **समाजबांधवांना शिक्षित करणे** इत्यादी संदर्भातील कर्तव्ये त्यांनी कशी पार पाडली, यावर विनोदी शैलीने हसत खेळत प्रबोधनपर मार्गदर्शन केले. **ज्ञानदानासारख्या पवित्र कार्यातील अनुभव तसेच शिक्षकांनी पाळावयाची नितीमुल्ये** यावर देखील खास मार्गदर्शन केले.

विवा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. पी. पांडे यांनी **मराठी भाषा व आपले नाते** यावर सहज संवाद साधला. महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. प्राजक्ता परांजपे यांनी वाङ्मय म्हणजे काय ? वाङ्मयाचा जीवनाशी असलेला संबंध तसेच भाषा संवर्धनाच्या संदर्भात मार्गदर्शन केले. मराठी वाङ्मय मंडळाच्या अध्यक्षा प्रा. कविता पाटील यांनी वर्षभराचे कार्यक्रम व उद्दिष्ट्ये जाहिर करून अप्रत्यक्षपणे विवा महाविद्यालयातील मराठी वाङ्मय मंडळ किती संवेदनशीलतेने कार्यरत आहे हे नमूद केले. प्रा. विजया शिरसाट यांच्या आभारपर भाषणाने कार्यक्रमाची सांगता झाली. विवा महाविद्यालयाचे शैक्षणिक समन्वयक प्रा. कुट्टी यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

विवा महाविद्यालयातील शैक्षणिक तथा सांस्कृतिक कार्यक्रम व त्यामागील प्रेरणास्थान असलेल्या विवा व्यवस्थापक मंडळाचे तसेच संस्थेचे सहसचिव श्री. संजीव पाटील यांचे कार्यक्रमास विशेष मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांनी लावलेली हजेरी व दिलेला प्रतीसाद लक्षणीय ठरला.